| | |
|---|---|
| MHNS170000232009 | **संजय झिपरु शेवाळे**<br>**वि.**<br>**पांडुरंग राणू शेवाळे** |

## आदेश निशाणी १३२

## नियमित दिवाणी दावा क्र. ०३/२००९

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आला असून सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरीता तसेच अबेटमेंट सेट असाइड होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ९ विमलबाई प्रकाश आहेर ह्या दि. ११/०८/२०२२ रोजी मयत झाल्या. वादीने प्रतिवादीचा मृत्यू दाखला व वारसांची नावे आणि पत्ते मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांचा मृत्यू दाखला वादीस दि. ०५/०४/२०२५ रोजी मिळाला. वादीची पत्नी आजारी असल्यामुळे वादीस न्यायालयामध्ये येऊन प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेणे शक्य झाले नाही. या कारणामुळे वारस रेकॉर्ड वर घेण्यास दोन वर्षे अकरा महिन्यांचा उशीर झाला आहे व त्यामुळे दावा त्यांचेविरुध्द अबेट झाला आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जावर मयत प्रतिवादी क्र. ९ चे वारस हे स्वतःहून हजर होऊन म्हणणे दाखल केले व वादी मुद्दाम कामकाज लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत आहे त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

३. प्रस्तुत दाव्याचे व अर्जाचे अवलोकन करता, सदरचा दावा हा वाटपाकरीता व कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ९ ह्या दि.

११/०८/२०२२ रोजी मयत झाल्याचे कथन केले आहे. तसेच तिचे वारस देखील स्वतःहून वकीलांमार्फत हजर झाले आहेत. वादीस प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेण्यास दोन वर्षापेक्षा जास्तीचा विलंब झाल्याचे दिसून येते. सदरचा विलंब होण्यासाठी जे कारण वादींनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे ते योग्य व कायदेशीर वाटते. तसेच अर्जातील कारणांचा विचार करता व दावा गुणवत्तेवर सुनावणीकरीता वादी विरुध्द झालेला आदेश सेट असाईड करुन मंजूर करणे योग्य वाटते. सदरचे अर्जास झालेला विलंब हा दोन वर्षापेक्षा जास्त असल्याने व सदरचे प्रकरण हे खूप जुने असल्याने प्रस्तुतचा अर्ज हा दंडाची रक्कम भरुन मंजूर करणे मला योग्य व कायदेशीर वाटते. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | निशाणी १३२ वरील अर्ज वादीने दंडाची रक्कम रु. १,०००/- प्रतिवादी क्र. ९ चे वारसांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २. | दंडाची रक्कम भरलेनंतर वादीस प्रतिवादी क्र. ९ (मयत) विमलबाई प्रकाश आहेर यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. वादीने आदेशाप्रमाणे दाव्यात योग्य ती दुरुस्ती करुन दावा दुरुस्तीच्या योग्य त्या प्रती अभिलेखावर दाखल कराव्यात. |

JAGDISH MADHAV AGNIHOTRI

Digitally signed by JAGDISH MADHAV AGNIHOTRI
Date: 2025.07.21 16:04:29 +0530

(जगदीश एम. अग्नीहोत्री)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदगांव.
ता.नांदगांव, जि.नाशिक.

नांदगांव.
दि. २१/०७/२०२५

(MH02817)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS